**ठळक बातम्या**

- भाऊबीजेच्या सणाचा सर्वत्र उत्साह/ विविध उपक्रमांमधून दिवाळी साजरी

- सेन्सेक्स आणि निफ्टीचा,  वर्षभरातल्या उच्चांकी पातळीला स्पर्श

- महिलांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंड विरुद्धच्या सामन्यात भारतीय सलामीवीरांची शतकी कामगिरी

**आणि**

- ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यातही भारतीय पुरुष क्रिकेट संघ पराभूत

<><><><><>

देशभरात आज भाऊ बहिणीचं नातं दृढ करणारा भाऊबीजेचा सण उत्साहाने साजरा केला जातोय. आजच्या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या दीर्घायुष्याची कामना करत भावाचं औक्षण करतात. तर ओवाळणी म्हणून भाऊ बहिणींना त्यांचं संरक्षण करण्याचं वचन देतात.

भावाबहिणीच्या अतूट नात्याचं प्रतीक असलेला हा सण प्रत्येकाच्या जीवनात आनंद आणि समृद्धी घेऊन येतो, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही भाऊबीजेनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

राज्यातल्या विविध जिल्ह्यात आज  भाऊबीजनिमित्तानं अनोखे उपक्रमही आयोजित करण्यात आले होते.

**यवतमाळ** जिल्ह्यतल्या पुसद इथं माणुसकीची भिंत संस्थेनं बेघर, दिव्यांग असहाय वृद्ध आणि अनाथांसोबत भाऊबीज साजरी केली. माणुसकीची भिंत

परिसरात स्वच्छता करून निराधार पुरुषांची दाढी-कटिंग करण्यात आली. त्यानंतर महिलांनी त्यांना ओवाळलं.

**बुलढाणा** जिल्ह्यातल्या देऊळगाव राजा तालुक्यात निमगाव गुरु इथल्या धारे बंधूनी भाऊबीजनिमीत्त आपल्या बहिणीला संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रतिमा भेट देऊन सांविधानिक मुल्ये जपण्याचा संदेश दिला.

<><><><><>

आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी आज यवतमाळ जिल्ह्यातल्या कळंब तालुक्यात गणेशवाडी पोड इथं आदि सेवा केंद्राचं उद्घाटन केलं. आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्याचं काम या केंद्राद्वारे केलं जात असून शिक्षण, आरोग्य, शेती यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये विकास होत असल्याचं उईके यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

दिवाळीच्या काळात खासगी बसचालक जादा तिकिट दर आकारत असल्याच्या प्रवाश्यांच्या तक्रारींची दाखल घेत, पुणे प्रादेशिक परिवहन विभागानं शहराच्या वेगवेगळ्या भागात ४२ खासगी बसची तपासणी केली. त्यापैकी १९ बस चालकांनी नियमांचं उल्लघन केल्याचं आढळल्यानं त्यांना दंड ठोठावण्यात आला.

<><><><><>

सकाळी जोरदार तेजी नोंदवलेल्या देशातल्या शेअर बाजारांनी आज वर्षभरातल्या उच्चांकी पातळीला स्पर्श केला. मात्र गुंतवणूकदारांनी नफा काढून घेणं पसंत केल्यानं दिवसअखेर ही तेजी तितकीशी टिकू शकली नाही. तरी सलग सहाव्या सत्रात दोन्ही निर्देशांक वाढ नोंदवून बंद झाले. व्यवहारांच्या दरम्यान सेन्सेक्स ८५० हून अधिक अंकांनी वधारुन ८५ हजार ३०० च्या जवळ गेला होता. निफ्टीही सव्वा दोनशेहून अधिक अंकांनी वधारुन २६ हजार १०० अंकांच्या पार पोहोचला होता. दिवसअखेर सेन्सेक्स १३० अंकांची वाढ नोंदवून ८४

हजार ५५६ अंकांवर बंद झाला. निफ्टीही २३ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ८९१ अंकांवर बंद झाला. माहिती तंत्रज्ञान, खासगी बँकांचे समभाग आज तेजीत होते.

सोन्याचे दर आज तोळ्या मागे साडे पाचशे रुपयांनी घसरले तर चांदी किलोमागे १ हजार रुपयांनी स्वस्त झाली. त्यामुळं सोनं २२ कॅरेट तोळ्यामागे १ लाख २१ हजार रुपयांना तर चांदी किलोमागे १ लाख ५२ हजार ५०० रुपयांना विकली जात होती.

**<><><><><>**

बँक खात्यांसाठी वारसदारांची नोंदणी करण्याची प्रक्रिया एक नोव्हेंबरपासून आणखी सुलभ होणार आहे. यात ४ व्यक्तींची वारसदार म्हणून नोंदणी करता येईल. त्यामुळं ठेवीदार आणि त्यांच्या वारसांचे दावे निकाली काढणं सोपं होणार आहे. बँकिंग कायद्यातल्या या संदर्भातल्या सुधारणांची अंमलबजावणी पुढच्या शनिवारपासून सुरू होणार असल्याचं केंद्रीय अर्थ मंत्रालयानं म्हटलंय.

**<><><><><>**

भारताच्या गगनयान या मानवरहित अंतराळयानाच्या निर्मितीचं ९० टक्के काम पूर्ण झालं असून डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात ते चाचणी उड्डाणासाठी सज्ज आहे. इसरोचे अध्यक्ष डॉ. व्ही नारायणन यांनी आज बंगळुरूमधे पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. या उड्डाणात व्योममित्र हा यंत्रमानव यानातून पाठवला जाईल. २०२७ मधे गगनयानचं पूर्ण उड्डाण होणार असून त्यावेळी ३ भारतीय अंतराळवीर त्यातून प्रवास करुन परत पृथ्वीवर येतील. असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबई गुन्हे शाखेने सलीम डोला ड्रग्ज प्रकरणात दुबईतून हद्दपार करण्यात आलेला दाऊदचा साथीदार हँडलर मोहम्मद सलीम सुहेल शेखला काल अटक केली.

सलीम शेखवर महाराष्ट्रात मेफेड्रोन ड्रग्ज उत्पादन नेटवर्कशी संबंधित ड्रग्ज ऑपरेशन्सचं व्यवस्थापन केल्याचा आरोप आहे.

<><><><><>

मुंबईत आज जोगेश्वरी पश्चिमेला कार्यालयाच्या इमारतीला लागलेल्या आगीतून अग्निशमन दलानं २७ जणांची सुटका केली. त्यापैकी १७ जणांना धुराचा त्रास झाल्यानं जवळच्या रुग्णालयात दाखल केलं होतं. सध्या ९ जणांवर उपचार सुरू असून इतर जण घरी गेले आहेत. या आगीत इमारतीच्या ४ मजल्यांवरच्या कार्यालयातलं सामान जळून खराब झालं.

<><><><><>

मुंबईतल्या मुलुंडमध्ये बेस्ट बस आणि टेम्पो यांच्यात झालेल्या धडकेत सात जण जखमी झाले. ही घटना आज दुपारी मुलुंड-ऐरोली पुलावर घडली.

<><><><><>

केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी आज अकोला आकाशवाणी केंद्राला भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला. किसानवानी, लोकसंगीत यासह विविध कार्यक्रम, NEWS On AIR ॲपचा वापर विषयी त्यांनी जाणून घेतलं. अधिकाधिक प्रेरणादायी कार्यक्रमांची निर्मिती करावी, महसूल मिळवण्यावर भर द्यावा अशा सूचना त्यांनी दिल्या.

<><><><><>

महिलांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या साखळी फेरीत, आज नवी मुंबईच्या डॉ. डी. वाय. पाटील क्रीडा अकादमीच्या मैदानावर भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सामना सुरु आहे. या सामन्यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम, क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या भारताच्या सलामीवीरांनी द्विशतकी भागिदारीसह भारताला दमदार सुरुवात करून दिली. भारताच्या सलामीवीर प्रतिका रावल हीनं १२२ आणि स्मृती मंधाना हीनं १०९ धावा केल्या. तिसऱ्या

क्रमांकावर आलेल्या जेमिमाह रॉड्रीग्जनं देखील अर्धशतक झळकावत भारताला ३०० धावांचा टप्पा पार करून दिला.

४८ षटकात भारताच्या २ बाद ३२९ धावा झाल्या असताना पावसाच्या व्यत्ययामुळं खेळ थांबवावा लागला आहे.

गुणतालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी ५ सामन्यांमधून ४ गुणांची कमाई केली आहे. त्यामुळे स्पर्धेच्या उपांत्यफेरीत प्रवेश करण्याच्यादृष्टीनं हा सामना दोन्ही संघासाठी महत्वाचा आहे.

दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडच्या संघानं यापूर्वीच उपांत्य फेरीतलं स्थान पक्कं केलं आहे.

<><><><><>

ॲडलेड इथं भारतासोबत झालेला दुसरा एकदिवसीय सामना, ऑस्ट्रेलियानं २ गडी आणि २२ चेंडू राखून जिंकला. या विजयासोबतच ऑस्ट्रेलियानं या तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतानं कर्णधार आणि सलामीवर शुभमन गील आणि विराट कोहलीला झटपट गमावलं. त्यानंतर रोहीत शर्मा आणि श्रेयस अय्यर यांनी वैयक्तिक अर्धशतकांसह तिसऱ्या गड्यासाठी ११८ धावांची भागिदारी करत भारताचा डाव सावरला. अक्षर पटेल यानंही ४४ धावांचं मोलाचं योगदान दिल्यानं भारताला निर्धारीत ५० षटकांत ९ बाद २६४ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाच्या ॲडम झाम्पा यानं भारताचे ४ गडी बाद केले.

विजयासाठी २६५ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरुवातही फारशी चांगली झाली नाही. २७ षटकांत केवळ १३२ धावांत त्यांचे चार गडी बाद झाले होते. मात्र मॅथ्यू शॉर्ट आणि कूपर कॉनोली यांनी दमदार अर्धशतकी खेळी

करत ऑस्ट्रेलियाला विजया समीप पोहचवलं. शॉर्ट यानं ७४ तर कॉनोली यानं ६१ धावा केल्या.

मालिकेतला तिसरा आणि अखेरचा सामना येत्या २५ तारखेला सिडनी इथं होणार आहे.

**<><><><><>**

राज्यात काल तुरळक ठिकाणी पाऊस पडला. रत्नागिरीत आज पावसानं हजेरी लावली.

येत्या २४ तासात कोकणात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडेल, असं पुणे वेधशाळेनं कळवलं आहे.

//<><><><><>//